"परभणी जिल्ह्यातील भूमिहीन शेतमजूर महिलांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचे अध्ययन (2011-12 ते 2021-22)"

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव्यविद्याशाखे अंतर्गत अर्थशास्त्र विषयाच्या पीएच.डी. (विद्यावाचस्पती)

पदवीकरिता सादर करावयाचा प्रबंध आराखडा

संशोधक

मुंढे सुनिल ज्ञानदेव

(एम.ए. अर्थशास्त्र)

मार्गदर्शक

प्रा.डॉ. मदन लक्ष्मण शेळके

अर्थशास्त्र विभाग प्रमुख व संशोधन मार्गदर्शक

कै. बापूसाहेब पाटील एकंबेकर महाविद्यालय, उदगीर जि. लातूर

संशोधन केंद्र

शिवाजी महाविद्यालय, उदगीर जि. लातूर

ऑगस्ट 2023

"परभणी जिल्ह्यातील भूमिहीन शेतमजूर महिलांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचे अध्ययन (2011-12 ते 2021-22)"

प्रास्ताविक :

शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. भारताने आर्थिक विकासाचा मोठा टप्पा पार केला असला तरी अजूनही 50 ते 60 टक्के लोकसंख्या शेतीवर अवलंबून आहे. या लोकसंख्येचे उत्पन्नाचे प्रमुख साधन म्हणून शेतीकडे पाहिले जाते. मानवाला लागणाऱ्या अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजा पैकी अन्न ही गरज शेतीमधून पूर्ण होते. त्यामुळे देशाच्या विकासात शेतीला प्रथम स्थान आहे. भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास हा शेतीवर अवलंबून आहे. आजही देशाच्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नात शेतीचा वाटा जवळपास 20 टक्के दिसून येतो. उद्योगासाठी लागणारा कच्चामाल शेती मधून पुरवला जातो. तसेच उद्योगाच्या दृष्टीने शेती व्यवसाय महत्त्वाची भूमिका बजावतो.

शेतमजूर हा भारताच्या कृषी अर्थव्यवस्थेचा आणि ग्रामीण भागातील आर्थिक व सामाजिक जीवनाचा एक अभिन्न व महत्त्वपूर्ण घटक समजला जातो. नियोजन मंडळाच्या मताप्रमाणे शेतमजूरांचा प्रश्न म्हणजे एक नि:संदिग्ध आव्हानच आहे आणि या प्रश्नाची समाधानकारक सोडवणूक करण्याचे उत्तरदायित्व संपूर्ण समाजावरती आहे. भारतासारख्या कृषीप्रधान देशात शेती व्यवसायात मुख्य आधारस्तंभ शेतमजूर असून शेतीची उत्पादकता मजूराच्या कार्यक्षमतेवर अवलंबून आहे. उद्योग प्रधान देशाच्या तुलनेत भारतासारख्या कृषी प्रधान अर्थव्यवस्था असलेल्या देशात शेतमजूरांच्या वर्गाचा आकार देशाची लोकसंख्या, लोकसंख्या वाढीचा दर शेतीवर अवलंबून असल्याने लोकसंख्येचा भाग, शेतीची स्थिती, शेतीमध्ये करण्यात येणाऱ्या यंत्राचा उपयोग, ग्रामीण भागात जनतेला उपलब्ध असलेल्या रोजगाराच्या

सोयी व नागरीकरणाची प्रक्रिया अशा अनेक बाबींवर अवलंबून आहे. 2011 च्या जनगणनेनुसार भारतात कृषी क्षेत्रात गुंतलेल्या कामगारांचा वाटा (शेतकरी आणि शेतमजूर) 54.6% इतका आहे. तसेच महाराष्ट्र राज्यात एकूण क्रियाशील लोकसंख्येत शेतमजुराचे प्रमाण 26 टक्के इतके आहे. मराठवाडा हा महाराष्ट्र राज्याचा एक प्रतिनिधिक विभाग असून त्याचे क्षेत्रफळ 64.811 चौ. किमी इतके असून सध्या मराठवाड्यात एकूण आठ जिल्हयाचा समावेश असून औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर) हे याचे मुख्यालय आहे. कापूस उत्पादनात मराठवाडयातील एक अत्यंत महत्वाचा जिल्हा म्हणून परभणी जिल्हयाची ओळख आहे. कारण येथे कापूस लागवड योग्य काळी जमीन मोठया प्रमाणात उपलब्ध आहे.

विषयाची निवड :

भारत हा कृषिप्रधान देश असून सन 1951 पासून भारत सरकारने आर्थिक विकासाच्या दिशेने पहिले पाऊल टाकले. सन 1965 च्या हरितक्रांतीने देशातील कृषी क्षेत्रात अमुलाग्र बदल घडून आला. परंतु देशातील कृषी क्षेत्राशी संबंधित असणारा शेतमजूर मात्र आर्थिक व सामाजिक विकासापासून वंचित राहिला. कृषी क्षेत्राच्या विकासाचा मुख्य सूत्रधार म्हणजे शेतमजूर होय. शेतमजूराचा आर्थिक विकास हा त्याला मिळणाऱ्या उत्पन्नावर अवलंबून असतो. कृषी क्षेत्रातील पुरुष शेतमजूरा सोबतच स्त्री शेतमजूरही महत्त्वाची भूमिका पार पाडते. महिला शेतमजूराचे साधारणपणे कुशल व अकुशल असे वर्गीकरण लक्षात घेता असे दिसून येते की, साधारणपणे शिक्षित व कुशल लोकांना उत्पन्न चांगले मिळते. त्या उत्पन्न वाढीमुळे त्याची बचत वाढताना दिसते तर अकुशल मजूरांच्या बाबतीत कामाचे स्वरूप हे हीन व कमी मजूरी दराचे असल्यामुळे त्यांना उत्पन्न कमी मिळते. तसेच त्यांना मिळणारे वेतनही कमी असते. केंद्र शासन व महाराष्ट्र शासनाद्वारे

शेतमजूरांकरिता विविध कल्याणकारी योजना राबविल्या जातात, परंतू मोजक्याच योजनेचा लाभ त्यांना मिळतो. कुशल मजूरांना अधिक काळ श्रम करूनही मिळणारा कमी मोबदला आणि त्यातून दैनंदिन गरजा, मुलांचे शिक्षण या मूलभूत बाबी देखील पूर्ण होऊ शकत नाहीत. त्यामुळे ते दारिद्रयाच्या दुष्टचक्रात अधिक अडकले जातात.

या संशोधनात परभणी जिल्ह्यातील कृषी क्षेत्रात काम करणाऱ्या भूमिहीन महिला शेतमजूरांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा चिकित्सक अभ्यास करणार असून महिलांना मजूरी व्यतिरिक्त दुसरे उत्पन्नाचे साधन उपलब्ध आहे का? त्यांना देण्यात येणारे वेतन योग्य आहे का? भूमिहीन शेतमजूर महिलांची आर्थिक स्थिती सुधारली आहे का? भूमिहीन शेतमजूर महिलांसाठीच्या योजनेचा त्यांना खरोखर फायदा झाला आहे का? भूमिहीन शेतमजूर महिलांच्या संख्येत वाढ झाली आहे का? त्यांचा सामाजिक स्तर सुधारला आहे का? त्यांच्या राहणीमानात बदल झाला आहे का? याचा अभ्यास करून त्यामध्ये सुधारणा करण्याच्या दृष्टीने एक प्रयत्न म्हणून परभणी जिल्ह्यातील भूमिहीन शेतमजूर महिलांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचे अध्ययन (2011-12 ते 2021-22) या संशोधन विषयाची निवड करण्यात आली आहे.

उद्‌दिष्टे :

परभणी जिल्ह्यातील भूमिहीन शेतमजूर महिलांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचे अध्ययन करण्यासाठी काही उद्‌दिष्टे निश्‍चित केली आहेत ती पुढील प्रमाणे सांगता येतील......

1) परभणी जिल्ह्यातील भूमिहीन शेतमजूर महिलांच्या आर्थिक स्थितीचे अध्ययन करणे.

2) परभणी जिल्हयातील भूमिहीन शेतमजूर महिलांच्या सामाजिक स्थितीचा अभ्यास करणे.

3) परभणी जिल्हयातील भूमिहीन शेतमजूर महिलांसाठीच्या शासकीय योजनेचा अभ्यास करणे.

4) परभणी जिल्हयातील भूमिहीन शेतमजूर महिलांच्या शेतमजूरी दरातील बदलाचे अध्ययन करणे.

5) परभणी जिल्हयातील भूमिहीन शेतमजूर महिलांच्या राहणीमानाचा अभ्यास करणे.

गृहीतके :

1) परभणी जिल्हयातील भूमिहीन शेतमजूर महिलांच्या उत्पन्नात वाढ झाल्यामुळे त्यांची बचत वाढत आहे.

2) परभणी जिल्हयातील भूमिहीन शेतमजूर महिलांच्या संख्येत वाढ झाली आहे.

3) परभणी जिल्हयातील भूमिहीन शेतमजूर महिलांना हंगामी रोजगार मिळतो.

4) कृषी क्षेत्रातील तंत्रज्ञानामुळे परभणी जिल्हयातील भूमिहीन शेतमजूर महिलांना बेरोजगारीला सामोरे जावे लागते.

5) परभणी जिल्हयातील भूमिहीन शेतमजूर महिलांनी शासकीय योजनेचा लाभ घेतला आहे.

संशोधन पद्धती (Research Methodology) :

"परभणी जिल्ह्यातील भूमिहीन शेतमजूर महिलांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचे अध्ययन (2011-12 ते 2021-22)" या विषयाच्या संशोधनासाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात येईल. तसेच विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीत उपलब्ध असणाऱ्या साधनसामग्रीवर आधारित विश्लेषण करण्यात येईल. हे अध्ययन प्राथमिक व दुय्यम अशा दोन्ही स्त्रोतावर आधारित असेल परंतु प्रत्यक्ष भार मात्र प्राथमिक स्त्रोतावर असेल तसेच निरीक्षण, प्रत्यक्ष मुलाखत, प्रश्नावली, अनुसूची याचा प्रस्तुत संशोधनासाठी वापर केला जाईल.

नमुना निवड पद्धती :

परभणी जिल्ह्यात एकूण 9 तालुके असून त्यापैकी 6 तालुक्यातून (जिंतूर, सेलू, मानवत, पाथरी, परभणी, गंगाखेड) प्रत्येकी 10 गावातून 15 महिलांची निवड केली जाणार आहे. असे एकूण 60 गावातून 900 महिला शेतमजूरांचा अभ्यास करण्यासाठी निवड केली जाईल. त्यांची प्रत्यक्ष मुलाखत, अनुसूची, प्रश्नावली या प्राथमिक साधनांच्या साहयाने तथ्य संकलन संकलित करण्यात येणार आहे. अशा एकूण 900 शेतमजूर महिलांची यादृच्छिक नमुना निवडीचा वापर करण्यात येणार असून सहेतुक नमुना निवडीचा वापर करण्यात येणार आहे.

1) प्राथमिक स्त्रोत :

प्राथमिक माहिती ही निवड केलेल्या भूमिहीन शेतमजूर महिलांना प्रत्यक्ष भेटून, मुलाखत, निरीक्षण किंवा प्रश्नावली द्वारे तथ्यांचे संकलन करण्यात येईल.

2) द्‌वितीय स्त्रोत :

अध्ययन विषयाशी संबंधित दुय्यम तथ्य संकलित करण्यासाठी महाराष्ट्र शासनाचा सांख्यिकीय गोषवारा, मानव विकास अहवाल, जिल्हा गॅझेट, आर्थिक व सामाजिक समलोचन, अप्रकाशित पी.एच.डी. प्रबंध, एम.फील. प्रबंध, मासिके, प्रकाशित ग्रंथ, वर्तमानपत्रे, गूगल वेबसाईट व इतर प्रकाशित माहितीचा वापर करण्यात येणार आहे.

संशोधनाचा कालावधी :

प्रस्तुत संशोधनाच्या अभ्यासाकरिता (2011- 12 ते 2021-22) असा दहा वर्षाचा कालावधी निश्चित करण्यात आला आहे.

संशोधनाची व्याप्ती :

प्रस्तुत संशोधनात परभणी जिल्ह्यातील भूमिहीन शेतमजूर महिलांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास करण्यात येणार आहे. म्हणजेच प्रस्तुत संशोधनाची व्याप्ती ही परभणी जिल्ह्यापुरती मर्यादित आहे.

प्रकरणाची रूपरेषा :

प्रस्तुत विषयाच्या संशोधन कार्यासाठी संशोधन आराखडा तयार करण्यात आला आहे. संशोधन विषयाच्या उद्‌देशानुसार सदरील संशोधनात एकूण सहा प्रकरणाचा समावेश केला आहे.

प्रकरण पहिले - प्रास्ताविक व संशोधन पद्धती :

पहिल्या प्रकरणात प्रास्ताविक, भूमिहीन शेतमजूरांची व्याख्या, शेतमजूराचे वर्गीकरण, शेतमजूराची वैशिष्ट्ये,भूमिहीन शेतमजूराच्या समस्या, परभणी जिल्हयातील भूमिहीन शेतमजूर महिलांची संख्या, संशोधन विषयाची निवड, संशोधनाची उद्दिष्टे, गृहीतके, संशोधन पद्धती, नमुना निवड, तथ्य संकलन, तथ्यांचे विश्लेषण, संशोधनाची व्याप्ती व मर्यादा, प्रकरणाची रूपरेषा इत्यादी बाबींचा आढावा घेण्यात येणार आहे.

प्रकरण दुसरे - संशोधन साहित्याचा आढावा :

या प्रकरणांमध्ये भूमिहीन शेतमजूर महिलांवर केलेल्या अभ्यासाचा, सरकारचे विविध अहवाल, साहित्याचे अहवाल, संदर्भ ग्रंथ, प्रकाशित व अप्रकाशित शोधप्रबंध, विविध मासिके, नियतकालिकातील शोधनिबंध इत्यादी संबंधित साहित्याचा आढावा घेण्यात येणार आहे. तसेच अनेक विचारवंत व लेखकांच्या अध्ययनाचा आढावा घेतला जाईल.

प्रकरण तिसरे - परभणी जिल्हयाची पार्श्वभूमी :

या प्रकरणात परभणी जिल्हयाची निर्मिती, स्थान व विस्तार, परभणी जिल्हयाची भौगोलिक माहिती, परभणी जिल्हयातील क्षेत्रवार आर्थिक उत्पन्न, जिल्हयाची लोकसंख्या, परभणी जिल्हयातील क्षेत्रवार रोजगार निर्मिती, रोजगार निर्मितीच्या विविध योजनांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण चौथे - परभणी जिल्हयातील महिला शेतमजूरांची स्थिती :

या प्रकरणात परभणी जिल्ह्यातील महिला शेतमजूरांचा कृषी क्षेत्रातील सहभाग, मजूराचे उत्पन्न, भारतातील, महाराष्ट्रातील, परभणी जिल्ह्यातील, महिला शेतमजूरांची स्थिती या संदर्भात अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण पाचवे – परभणी जिल्ह्यातील भूमिहीन शेतमजूर महिलांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास :

प्रस्तुत प्रकरण हे संशोधनाचा मूळ गाभा आहे व हे प्रकरण प्रश्नावली वर आधारित आहे. या प्रकरणात परभणी जिल्ह्यातील भूमिहीन शेतमजूर महिलांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचे विश्लेषण करण्यात येणार आहे. गोळा केलेल्या माहितीवरून भूमिहीन शेतमजूर महिलांची शैक्षणिक स्थिती, पूरक व्यवसाय, रोजगाराचे प्रमाण, राहणीमानाची स्थिती, मजुरी दर व बचतीचे प्रमाण, भूमिहीन शेतमजूर महिलांची वैवाहिक स्थिती, दारिद्रयाचे प्रमाण, त्यांच्या संख्यात्मक स्थितीचा आढावा, भूमिहीन शेतमजूर महिलांचे शोषण इत्यादीचा विश्लेषणात्मक पद्धतीने अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण सहावे – निष्कर्ष व शिफारशी :

प्रस्तुत प्रकरणांमध्ये गृहीतकाची पडताळणी, निष्कर्ष आणि शिफारशी यांचा समावेश करण्यात आला आहे.

संदर्भसूची :

1) अग्रवाल ए. एन. – “भारतीय शेती विषयक प्रश्न” विकास प्रकाशन- 1996

2) जोशी एस.एस. - “मुलभूत पातळीवरील स्त्री कामगार - एक सामाजिक अभ्यास” आशिष पब्लिशिंग हाऊस, नवी दिल्ली

3) पंडित आणि पाटील लीला - “कृषी अर्थशास्त्राची मुलतत्वे”

4) Bhole R. R. and Palki A Socio Economic Dimensions of Farm Women Labour Rural

5) फडणवीस मृणालीनी व देशपांडे, “श्रम अर्थशास्त्र” 2002

सशोधक विद्यार्थी

मुंढे सुनिल ज्ञानदेव

संशोधन मार्गदर्शक